MHNS200025252022

| | | |
|---|---|---|
| अर्ज दाखल दिनांक | : | ०७/१०/२०२२ |
| अर्ज नोंदणी दिनांक | : | ०७/१०/२०२२ |
| अर्ज निकाल दिनांक | : | १७/०३/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष म दि |
| | | ०३ ०५ १० |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. २ सिन्नर यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी ऋ. रा. जाधव)**

**फौजदारी किरकोळ खटला क्र. ३७८/२०२२**

**निशाणी क्रमांक – ४४**

१. रेखा महेंद्र उबाळे, वय– ३३ वर्षे

२. सान्वी महेंद्र उबाळे, वय– १४ वर्षे

३. साई महेंद्र उबाळे, वय– १२ वर्षे

क्र. १ ते ३ धंदा– काही नाही

क्र. १ स्वतःकरिता व क्र. २ व ३ ची अ.पा.क. म्हणुन

जनक माता

सर्व रा. द्वारा श्री. भास्कर हरी लोंढे, रा. ढोकेनगर,

शहा गोडावुनच्या मागे, सरदवाडी रोड, सिन्नर, ता.

सिन्नर, जि. नाशिक. : **अर्जदार**

**विरुध्द**

महेंद्र म्हसु उबाळे, वय– सज्ञान

धंदा – व्यवसाय,

रा. लक्ष्मी नारायण लॉन्स जवळ, पाण्याच्या टाकीजवळ,

शिवाजीनगर, सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक. : **सामनेवाला**

**अर्ज : फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे पोटगी करीता.**

अर्जदारांतर्फे विधिज्ञ – श्री. एस. डी. चांदोरे

सामनेवालेतर्फे विधिज्ञ – श्री. डी. ए. रहाटळ

**न्यायनिर्णय**

(दि. १७/०३/२०२६)

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार क्र. १ हिने स्वतःसाठी व अर्जदार क्र. २ व ३ यांच्यासाठी सामनेवालेकडुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये पोटगीची मागणी केली आहे.

२) अर्जदार क्र. १ हिचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ हिचा विवाह सामनेवालेसोबत दि.२९.०४.२००८ रोजी हिंदू धर्मशास्त्र रुढी परंपरेनुसार मौजे महात्मा फुल विद्यालय, सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक या ठिकाणी झालेला आहे. सदर विवाहाचा संपुर्ण खर्च हा अर्जदार क्र. १ व तिचे कुटूंबियांनी केलेला असुन मोठया थाटामाटात लग्न लावुन दिलेले आहे. सदर विवाह संबंधातुन अर्जदार क्र. १ हिस सामनेवाले पासुन दोन अपत्य नामे अर्जदार क्र. २ मुलगी नामे सान्वी व अर्जदार क्र. ३ मुलगा नामे साई ही झालेली असुन अर्जदार क्र. १ व सामनेवाला यांचे विवाहसंबंध अद्यापपावेतो कायम आहेत. लग्नासाठी सुमारे दिड ते दोन लाख रुपये खर्च करुन अर्जदार क्र. १ हिचे वडिलांनी कर्ज काढुन अर्जदार क्र. १ व सामनेवाला यांचा विवाह लावुन दिलेला होता. अर्जदार क्र. १ हिचे आईवडिल मोलमजुरी करुन त्यांचे पोट भरत असताना देखील तिचे आईवडिलांनी सामनेवाला यास एक तोळा वजनाची सोन्याची अंगठी, कपडे,संसारोपयोगी वस्तु जसे की, शोकेस, दिवाण, इ. वस्तु देवुन सामनेवालाचे मनाप्रमाणे लग्न लावुन दिलेले आहे.

३) अर्जदार क्र. १ च्या कथनानुसार विवाहानंतर अर्जदार क्र. १ ही सामनेवाला यांच्या एकत्र कुटूंबात नांदण्यासाठी गेली. तेथे सामनेवालाबरोबर त्याचे आई वडिल व भाउ असे एकत्र राहत होते. अर्जदार क्र. १ हि विवाहानंतर सामनेवालेकडे नांदण्यास गेली असता सुरुवातीचे काही दिवस म्हणजेच दोन–तीन महिने अर्जदार क्र. १ हिस ब–यापैकी नांदविले

व त्यानंतर अर्जदार क्र. १ हिचा मानसिक, शारिरिक व बौध्दीक छळ केला. तसेच सामनेवालेस दारुचे व्यसन असल्यामुळे तो दारु पिवुन येवून तो अर्जदार क्र. १ हिस वेळोवेळी शिवीगाळ करत असे, मारहाण करत असे व जिवे मारण्याची धमकी देखील देत असे. सामनेवाला हा अर्जदार क्र. १ हिची योग्यरित्या देखभाल करत नसे. परंतु अर्जदार क्र. १ हिस सामनेवाला बरोबर प्रामाणिकपणे संसार करावयाचा असल्यामुळे अर्जदार क्र. १ हिस सर्व त्रास निमुटपणे सहन करत होती.

४) तिच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ ची सासु ही अर्जदार क्र. १ विषयी उलटसुलट खोटया गोष्टी सांगुन सामनेवाला यास अर्जदार क्र. १ हिस मारण्याकरीता उद्युक्त करत असे व सामनेवाला हा त्याच्या आईचे ऐकण्यावरुन अर्जदार क्र. १ हिस ब–याचवेळा मारहाण देखील केलेली आहे. तसेच पैशांचे कारणावरुन सामनेवाला व त्याचे कुटूंबियह अर्जदार क्र. १ सोबत वाद घालत असे. तिने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला याने अर्जदार क्र. १ हिस नांदविण्यास स्पष्टपणे नकार दिला व अर्जदार क्र. १ हिच्या वडिलांना उद्गारुन असे कथन केले की, ''पैसे आणल्याशिवाय आम्ही तुमच्या पोरीला नांदवणार नाही'' व सप्टेंबर २०२१ मध्ये कोणतेही वाजवी कारण घडलेले नसताना सामनेवाला व त्याचे कुटूंबियांनी अर्जदार क्र. १ हिस वाईटसाईट शिवीगाळ करुन अर्जदार क्र. १ हिस तिचे दोन्ही मुलांसह अंगावरील कपडयानिशी अर्जदार यांना घराबाहेर काढुल दिले. त्यामुळे नाईलाजास्तव अर्जदार क्र. १ हिस तिच्या दोन्ही मुलांसह तिच्या माहेरी तिच्या वडिलांसोबत सप्टेंबर २०२१ पासुन रहावे लागत आहे.

५) तिच्या कथनानुसार सामनेवाला यांनी वेळोवेळी अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे. अर्जदार क्र. १ हिची सामनेवालाबरोबर नांदण्याची प्रामाणिक इच्छा होती व आहे. परंतु सामनेवाला यास अर्जदार क्र. १ हिस नांदविण्याची इच्छा नव्हती व नाही. अर्जदार क्र. १ हिचा सामनेवालेवर अतोनात जिव असल्याचे व तिची सामनेवालाबरोबर संसार करण्याची तीव्र इच्छा असल्याचे तिने कथन केलेले आहे. अर्जदार क्र. १ हि तरुण असुन तिला संसारसुख देण्याची सामनेवालाची पती म्हणुन नैतिक जबाबदारी आहे. परंतु सामनेवालाच्या कुटूंबियांचे वर्तनामुळे अर्जदार हिस संसार सुखापासुन वंचित रहावे लागले

आहे. सामनेवाला यांचे कुटूंबियांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या अर्जदार क्र. १ हिचा व तिचे कुटूंबियांचा मानसिक, शारिरिक व बौध्दीक छळ केलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांना नाईलाजास्तव माहेरी रहावे लागत आहे.

६) अर्जदार क्र. १ हिच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ हिस कोणताही कामधंदा नसुन ती तिचा व मुलांचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे. हे माहित असुन देखील सामनेवाला व त्याचे कुटूंबातील इतर सदस्यांनी देखील अर्जदार क्र. १ हिस मुलांसोबत नांदविणेकामी कोणतेही प्रामाणिक प्रयत्न केले नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिस तिचे मुलांसोबत तिचे माहेरी अपरिहार्यरित्या राहुन लाजिरवाणे जिवन जगावे लागत आहे. याउलट सामनेवाला हा फॅब्रिकेशनचा व्यवसाय व हॉटेल व्यवसायिक असुन त्यातुन त्यांना चांगले उत्पन्न मिळते व सामनेवाले यांचे स्वतःचे मालकीचे शिवाजीनगर येथे दुमजली बंगला असुन माळेगांव, ता. सिन्नर येथे दुमजली इमारती देखील आहेत म्हणजेच सामनेवाले यांना कोणत्याही प्रकारचे घरभाडे द्यावे लागत नाही व सामनेवाला हा व्यवसायिक असल्याने त्यास वेगवेगळया मार्गाने वार्षिक सुमारे २५ ते ३० लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाले याचेवर अर्जदारांशिवाय अन्य कोणाचीही पालनपोषणाची जबाबदारी नाही. सबब अर्जदार क्र. १ हिने विनंती केली आहे की, अर्जदारांना सामनेवाला पासुन अर्ज दाखल तारखेपासुन दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,००,०००/– अन्नवस्त्रापोटी मिळावे व प्रस्तुत अर्जाचा खर्च अर्जदार क्र. १ हिस सामनेवाला कडुन मिळावा.

७) अर्जदार क्र. १ हिच्या अर्जास सामनेवालातर्फे निशाणी क्र. १५ तर्फे जबाब देण्यात आला व त्यानंतर सामनेवाला याने त्याच्या जबाबामध्ये दुरुस्ती करुन त्याबाबतची दुरुस्तीप्रत नि.क्र. २१ वर दाखल केलेली आहे. सामनेवालाच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ व सामनेवाला यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे दिनांक २९.०४.२००८ रोजी मौजे महात्मा ज्योतीबा फुल संगमनेर नाका, सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे झालेला असुन सदर विवाह संबंध अद्याप कायम आहेत. सदर विवाहसंबंधातुन अर्जदार क्र. १ व सामनेवाला यांना दोन अपत्ये झालेली आहेत. त्याच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ हि लग्नानंतर सामनेवाल्याच्या घरी नांदण्यास आली तेव्हा सामनेवाला हा एकत्र कुटूंबात राहत होता.

अर्जदार क्र. १ हिचे माहेरकडील कुटूंब छोटे होते त्यामुळे अर्जदार क्र. १ हिस लग्नानंतर एकत्र कुटूंबात राहणे आवडत नव्हते व या कारणावरुन अर्जदार क्र. १ हि लग्नानंतर काही महिन्यातच सामनेवालाबरोबर वाद करु लागली व सामनेवालेच्या आईवडिलांना शिवीगाळ करु लागली. त्यामुळे सामनेवालाच्या आईवडिलांनी अर्जदार क्र. १ व सामनेवाले यांना स्वतंत्र राहण्याचा सल्ला दिला व सदर जागेत अर्जदार क्र. १ व सामनेवाला एकत्र संसार करु लागले. अर्जदार क्र. १ व सामनेवाला यांना लग्नानंतर दोन अपत्ये होवुन देखील अर्जदार क्र. १ च्या वागण्यात सुधार झाला नाही व अर्जदार क्र. १ हि किरकोळ कारणावरुन सामनेवालासोबत भांडण करत असे. सन २०१० मध्ये कोणतेही संयुक्तीक कारण नसताना अर्जदाराने सामनेवालेच्या आईवडिलांसोबत भांडण केले व घरात कोणालाही न सांगता माहेरी निघुन गेली. त्यानंतर अर्जदार आठ महिने तिच्या माहेरी राहिली व सामनेवालेने प्रयत्न करुनही अर्जदार क्र. १ ही नांदण्यास आली नाही. त्यानंतर सामनेवालेने अर्जदार क्र. १ हिस वकिलामार्फत रजिष्टर पोष्टाने नोटीस पाठविली मात्र नोटीस मिळुनही अर्जदार नांदण्यास आली नाही. म्हणुन सामनेवालेने पुन्हा नोटीस पाठविली तरीही अर्जदार नांदण्यास आली नाही. सामनेवाल्याने पाठविलेल्या नोटीसची माहिती जेव्हा अर्जदाराचे मामा ज्ञानेश्वर भास्कर भगत यांना मिळाली तेव्हा त्यांनी अर्जदाराला समजावुन सांगितले व ते अर्जदारास नांदण्यास घेवुन आले. तेव्हा अर्जदार म्हणाली की, यापुढे मी घरात व्यवस्थित नांदेल व कुटूंबात कोणालाही विनाकारण वाईटसाईट बोलणार नाही व इतके दिवस माहेरी राहत असल्याबाबत मला आता पश्चाताप झालेला आहे.

८) त्यानंतर अर्जदार क्र. १ हि काही दिवस बऱ्यापैकी नांदली व त्यानंतर पुन्हा पुर्वीसारखी वागु लागली. त्यादरम्यानच्या काळात त्यांना एक मुलगा झाला व अर्जदार क्र. १ हि लहान मुलाकडे व्यवस्थीत लक्ष देत नव्हती व मुलाचे संगोपन व वेळेवर जेवण देत नसे. सकाळी १०.३० वाजेच्या दरम्यान घराबाहेर पडुन रात्री ५ वाजेच्या दरम्यान घरी येत असे. एवढावेळ घराबाहेर जावुन काय करते अशी विचारणा सामनेवालेने अर्जदार क्र. १ हिस केली असता ती म्हणाली की, मी माझ्या माहेरी जाते. त्यानंतर सामनेवालेने अर्जदार क्र. १ हिच्या माहेरी आईकडे चौकशी केली असता तिची आई म्हणाली की रेखा १५ ते २० दिवसानंतर

एखाद्या वेळेस येते, ही बाब सामनेवालेने अर्जदार क्र. १ हिस विचारले असता त्याचे उत्तर तिला सांगता आले नाही. सदर कालावधीमध्ये सामनेवालेने अर्जदार क्र. १ हिस अनेक वेळा फोन केले मात्र अर्जदार क्र. १ हिचा फोन सतत व्यस्त येत असे. त्याबाबत सामनेवालेने अर्जदार क्र. १ हिस विचारणा केली असता त्याचे देखील अर्जदार क्र. १ हिस समर्पक उत्तर देता आले नाही. म्हणुन सामनेवालाने अर्जदार क्र. १ हिस कॉल हिस्ट्री दाखवण्याची मागणी केली, तेव्ही अर्जदार क्र. १ हिने कॉल हिस्ट्री डिलीट केल्याचे आढळुन आले.

९) त्याने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ हि घराबाहेर गेल्यानंतर घरी येताना महागडया वस्तु जसे की, ब्लुटुथ, सिंगर हेडफोन, मायक्रोओहन, महागडया साडया व पंजाबी ड्रेस घेवुन येत असे.सदर वस्तु घरात दिसल्यानंतर सामनेवालेने अर्जदार क्र. १ हिच्याकडे चौकशी केली असता तिने तिच्या भावाचे नाव सांगितले व सामनेवालेने अर्जदार क्र. १ च्या भावाकडे चौकशी केली तेव्हा त्यांनी आम्ही रेखा म्हणजेच अर्जदार क्र. १ हिस अशा कोणत्याही वस्तु दिल्या नसल्याचे सांगितले. सामनेवालेने चौकशी केली म्हणुन अर्जदार क्र. १ हिने सामनेवालेस जेवणाचा डबा पंधरा दिवस देणे बंद केले. तसेच अर्जदार हि स्वतंत्र रुम मध्ये जावुन झोपत असे व शारिरिक संबंधास नकार देत असे. या कारणावरुन अर्जदार क्र. १ हिने सामनेवालेसोबत वाद केला व माहेरी निघुन गेली. त्यानंतर अर्जदार क्र. १ हिने सिन्नर पोलीस स्टेशनला सामनेवालाविरुध्द तक्रार केली. त्यामुळे पोलीसांनी सामनेवाला व त्याच्या कुटूंबीयांना पोलीस स्टेशनला बोलावुन घेतले व सर्वांच्यासमक्ष अर्जदाराकडे वर्णन केलेल्या वस्तु घरात कशा आल्या व फोनवरती कोणाशी बोलत होती याची विचारणा केली असता अर्जदार क्र. १ हि गप्प बसुन राहिली व काहीही सांगण्यास नकार दिला.

१०) त्याच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ हिचे संसारात लक्ष नाही व तिचे मन बाहेर कोठेतरी रेंगाळत असल्यामुळे अर्जदार क्र. १ हि सामनेवालेच्या कुटूंबातील लोकांशी अरेरावीने व दादागीरीने वागत व बोलत असे. तसेच ती घराजवळ राहणा–या कांचन कांबळी या नावाच्या महिलेकडे दररोज तासनतास जात असे, याबाबत विचारणा केली असता अर्जदार क्र. १ हि समर्पक उत्तर देवु शकली नाही. त्यानंतर दिनांक ०१.११.२०२१ रोजी

रजिष्टर पोष्टाने नांदण्यास यावे म्हणुन नोटीस पाठवली मात्र अर्जदार क्र. १ हि नांदण्यास आली नाही. त्यानंतर सामनेवालेने अर्जदार क्र. १ हिने नांदण्यास यावे म्हणुन नातेवाईकामार्फत प्रयत्न केले. तसेच ४–५ महिन्यापुर्वी सामनेवाला हा ७–८ वेळेस अर्जदार क्र. १ च्या माहेरी जावुन नांदण्यास येण्याचा आग्रह धरला मात्र अर्जदार क्र. १ हिने नांदण्यास नकार दिला व म्हणाली की, ''मला तुमच्याबरोबर संसार करावयाचा नाही''. त्यानंतर दिनांक १५.०१.२०२३ रोजी अर्जदार क्र. १ हिचा मामा ज्ञानेश्वर भगत व डॉ. सदाशिव लोणारे अर्जदार क्र. १ हिस नांदण्यास घेण्यास गेले होते. तेव्हा त्यांनी अर्जदार क्र. १ हिस समजावुन सांगितले मात्र तिने त्यांचे काहीही ऐकुन घेतले नाही. तसेच सामनेवाला याच्या कथनाप्रमाणे तो मोलमजुरी करतो. तसेच अर्जदार हि तिच्या माहेरी प्लास्टीक वेल्डींगचा व्यवसाय करते त्यापासुन तिला दरमहा २५ हजार मिळतात. त्यामुळे अर्जदार क्र. १ हि स्वतःचा व अर्जदार क्र. २ व ३ यांचा सांभाळ करण्यास समर्थ आहे. तसेच सामनेवाला हा सन २०१६ च्या सुमारास वेल्डींगचे काम करतेवेळी ४० फुट उंचीवरुन खाली पडला. त्यामुळे त्याचे पाठीचे पाच मंडके मोडलेले आहे व उजव्या पायाचे संपुर्ण सेन्स गेलेले आहेत. तसेच त्याच्या दोन्ही हातांना ईजा झालेली आहे. त्यामुळे त्याचे ऑपरेशन देखील झालेले आहे. त्यामुळे सामनेवाला हा कोणतेही काम करु शकत नाही. त्यामुळे त्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

११) उभयपक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की सामनेवाला यास त्याच्या अर्जदार क्र. १ हिच्यासोबत झालेला विवाह व त्या विवाहसंबंधातुन त्यांना अर्जदार क्र. २ व ३ ही अपत्ये झाले असल्याबाबतचा मजकुर मान्य केलेला आहे. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, अर्जदार क्र. १ ही काही काम करत नसुन सामनेवाला याचा व्यवसाय आहे व तो आयकर देखील भरतो. त्याचे स्टेट बँक ऑफ इंडिया तसेच टी.जे.एस.बी. बँकेमध्ये खाते आहे. तसेच सामनेवालातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र. २ याने त्याच्या उलटतपासामध्ये सामनेवालाचे एम.आय.डी.सी येथे दोन कंपन्या असल्याचे, बंगला असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच सामनेवाला याने त्याच्या मालमत्ता व दायित्वाबाबतच्या शपथपत्रामध्ये त्याला दरमहा २५ हजार रुपये मिळत

असल्याबाबत देखील कथन केलेले आहे. त्यामुळे सामनेवाला हा अर्जदारांना सांभाळु शकतो व पोटगी देवु शकतो. त्यामुळे अर्जदारांच्या विधिज्ञांनी अर्जदारांना जास्तीत जास्त पोटगी मंजुर करण्याबाबत विनंती केलेली आहे. याउलट सामनेवाला यांच्या विधिज्ञांनी सामनेवालाच्या उत्पन्नाबाबत अर्जदाराने कोणताही दस्त दाखल केलेला नसल्याबाबत सांगितलेले आहे. तसेच त्यांनी अर्जदार क्र. २ व ३ हे शासकीय शाळेत जात असल्यामुळे त्यांच्यावर कोणताही शैक्षणिक खर्च होत नसल्याचे युक्तिवादामध्ये सांगितले आहे. तसेच सामनेवाला यांच्या विधिज्ञांनी पुढे असा युक्तिवाद केला की, अर्जदार क्र. १ हिच्या मारहाणीबाबत अर्जदार क्र. १ हिने कोणतीही तक्रार दिलेली नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिस सामनेवाला याने मारहाण केली ही गोष्ट सिध्द होत नाही. तसेच नि.क्र. २४ वर दाखल केलेल्या सातबारा उता–यामध्ये केवळ ७ आर क्षेत्र असल्याचे व ती जमिन गवतपाड असल्याचे सामनेवाला यांच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले आहे. तसेच नि.क्र. २५ वर दाखल केलेल्या सातबारा उता–यामध्ये सामनेवाला याच्या भावाचा देखील हिस्सा असल्याचे सामनेवाला याच्या विधिज्ञांनी युक्तिवादात सांगितले आहे. त्यांनी त्यांच्या युक्तिवादात पुढे असे सांगितले आहे की, जरी सामनेवाला याच्या साक्षीदार क्र. २ याने त्याच्या उलटतपासामध्ये सामनेवाला याचा बंगला असल्याचे मान्य केले असले तरी, परंतु तो बंगला सामनेवाला याचाच आहे किंवा कसे, याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच सामनेवाला याच्या विधिज्ञांनी सामनेवाला यास केवळ ४ ते ६ लाख रुपये एवढेच वार्षिक उत्पन्न असल्याचे युक्तिवादामध्ये सांगितलेले आहे. तसेच सामनेवाला याच्या विधिज्ञांनी अर्जदारांना कमीतकमी पोटगी मंजुर करण्याची विनंती न्यायालयास केलेली आहे.

१२) अर्जदार व सामनेवाला यांच्या कथनावरुन विचारार्थ उपस्थित झालेल्या बाबी व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहेत –

| **अ.क्र.** | **विचारार्थ बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सामनेवाला याने अर्जदारांच्या पालन पोषणात कसुर केल्याचे अर्जदारांनी सिध्द केले काय ? | होय |

| | | |
|---|---|---|
| २. | स्वतःचे पालनपोषणास असमर्थ असल्याचे अर्जदारांनी सिध्द केले आहे काय ? | होय |
| ३. | सामनेवाला याचेकडे अर्जदारांचे पालनपोषण करण्याकरीता पुरेसे साधन असल्याचे सिध्द होते काय ? | होय |
| ४. | अर्जदार हे पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | होय. अर्जदार क्र. १ हिस दरमहा रु.१०,००० /– प्रमाणे व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रु. ३००० प्रमाणे. |
| ५. | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला. |

**का र ण मि मां सा**

१३) अर्जाच्या पृष्ठ्यर्थ अर्जदार क्र. १ हिने स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ९ वर तिने तिचे मालमत्ता विषयक शपथपत्र नि.क्र. १० वर दाखल केले आहे. तसेच तिने तिच्या कथनाच्या पृष्ठ्यर्थ नि.क्र. २२ व २३ वर एम.आय.डी.सी अलोटमेंट ऑर्डर व नि.क्र. २४ व २५ वर मौजे कुंदेवाडीमजरे, ता. सिन्नर येथील जमिनीचे ७/१२ उतारे दाखल केलेले आहे. तसेच नि.क्र. २६ वर एन.सी.आर. दाखल केलेली आहे. अर्जदार क्र. १ हिने नि.क्र. ३० वर पुरसिस दाखल करुन तिला पुढील पुरावा देणे नाही असे कळवून तिचा पुरावा बंद केलेला आहे. याउलट सामनेवालेने स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ३३ वर दाखल केले आहे व साक्षीदार नामे डॉ. श्री. सदाशिव शंकर लोणारे यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ३८ वर दाखल केले आहे. त्याने त्याचे मालमत्ता विषयक शपथपत्र नि.क्र. ३३अ वर दाखल केले आहे. सामनेवाला याने नि.क्र. ३९ वर पुरसिस दाखल करुन त्याला पुढील पुरावा देणे नाही असे कळवून त्याचा पुरावा बंद केलेला आहे.

१४) विचारार्थ उपस्थित झालेल्या बाबी पाहण्यापूर्वी हे नमूद करणे उचित वाटते की, सामनेवालेने त्याच्या कथनामध्ये अर्जदारांबरोबरचे त्याचे नातेसंबंध मान्य केलेले आहेत. तसेच विवाहसंबंधातुन अर्जदार क्र. १ व सामनेवाला यास अर्जदार क्र. २ व ३ हे अपत्ये झाले असल्याची बाब देखील उभय पक्षकारांना मान्य आहे. अर्जदार क्र. १ ही विनंती केल्याप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र असल्याबाबतचा योग्य तो पुरावा अभिलेखावर आला आहे की नाही हे पाहणे आवश्यक आहे.

**<u>विचारार्थ बाब क्र. १ व २ करिता</u> :**

१५) अर्जदार क्र. १ हिने स्वतःस नि.क्र. ९ वर तपासलेले आहे. तिच्या कथनानुसार तिचा व सामनेवाला याच्या विवाहाचा खर्च अर्जदार क्र. १ हिच्या आईवडिलांनी केलेला असुन विवाहामध्ये सामनेवाला यास संसारउपयोगी साहित्य, अंगठी व कपडे दिलेले आहेत. तिने तिच्या पुराव्यात पुढे असे सांगितले आहे की, विवाहानंतर ती सामनेवाला याच्या घरी नांदण्यास गेली असता तिला दोन ते तीन महिने बरे वागविले. त्यानंतर सामनेवाला यांनी तिस शारिरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. तिने तिच्या पुराव्यात पुढे असे सांगितले आहे की, सामनेवाला हा दारु पिवुन येवून तिला मारहाण करीत असे व जीवे मारण्याची धमकी देत असे. तसेच सामनेवाला हा त्याच्या आईच्या सांगण्यावरुन त्याला मारहाण करत असे. तसेच सामनेवाला व त्याचे कुटूंब हे पैश्याच्या कारणावरुन अर्जदाराशी वाद घालत असल्याबाबत व पैसे आणल्याशिवाय अर्जदार क्र. १ हिस नांदविणार नसल्याबाबत तिने तिच्या पुराव्यात सांगितलेले आहे. तसेच त्यानंतर सप्टेंबर २०२१ मध्ये सामनेवाला व त्याच्या कुटूंबियांनी अर्जदारांना शिवीगाळ करुन नेसत्या कपडयानिशी घराबाहेर काढुन दिल्याबाबत तिने तिच्या पुराव्यात सांगितलेले आहे.

१६) सदर साक्षीदाराने तिच्या उलटतपासामध्ये विवाहामध्ये सामनेवाला यास संसारउपयोगी साहित्य दिल्याबाबत तिच्याकडे तिच्या तोंडी पुराव्याव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा नसल्याबाबत सांगितलेले आहे. तसेच तिने सामनेवालाविरुध्द तो तिच्या चारित्र्यावर संशय घेतल्याबाबत व भां.द.वि. कलम ४९८अ अन्वये तक्रार दिल्याबाबत देखील तिने

तिच्या उलटतपासात सांगितलेले आहे. तसेच तिने तिच्या उलटतपासामध्ये सामनेवाला याने तिला नांदायला यावे याकरिता दावा दाखल केला असल्याबाबत तिने तिच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे. तसेच सदर साक्षीदारास उलटतपासामध्ये ती सामनेवालासोबत नांदायला जाण्यास तयार आहे, याबाबत प्रश्न विचारला असता, तिने तिच्या उलटतपासामध्ये सामनेवालाबरोबर नांदायला जाण्यास तिने तयारी दर्शविलेली आहे. याव्यतिरिक्त अर्जदार क्र. १ हि तिच्या सरतपासातील कथनावर तिच्या उलटत पासामध्ये ठाम राहिल्याचे दिसुन येते.

१७) याउलट सामनेवाला याने त्याचे कथन सिध्द करण्याकरिता स्वतःस व डॉ. सदाशिव (सा.सा.क्र. २) यांना तपासलेले आहे. सामनेवाला याच्या पुराव्याचे शपथपत्राचे अवलोकन करता त्याने त्याच्या कथनाप्रमाणे त्याच्या पुराव्यातील शपथपत्रामध्ये मजकुर नमुद केल्याचे दिसुन येते. त्याने त्याच्या पुराव्यात विवाहाचा खर्च अर्जदार क्र. १ हिच्या आईवडिलांनी केले असल्याचा मजकुर अमान्य केलेला आहे. त्याने त्याच्या पुराव्यामध्ये त्याने अर्जदार क्र. १ हिचा शारिरिक व मानसिक छळ केला नसल्याचे व तिला मारहाण देखील केले नसल्याचे असे देखील सांगितले आहे. तसेच त्याने त्याच्या पुराव्यामध्ये अर्जदार क्र. १ हि विवाहनंतर एकत्र कुटूंबात राहण्यास आल्यामुळे व तिचे माहेरचे कुटूंब हे छोटे असल्यामुळे तिला एकत्र कुटूंबात राहणे आवडत नसल्याचे व या कारणावरुन त्यांच्यामध्ये वाद होत असल्याचे पुराव्यात सांगितलेले आहे. तसेच त्यामुळे अर्जदार क्र. १ हि सामनेवाला याच्या आईवडिलांना शिवीगाळ करीत असे. त्यानंतर अर्जदार क्र. १ व सामनेवाले हे स्वतंत्र राहुन एकत्र संसार करु लागले. त्या संसारातुन त्यांना अर्जदार क्र. २ व ३ अशी दोन अपत्ये झाले असल्याबाबत व किरकोळ कारणावरुन अर्जदार क्र. १ सामनेवालाबरोबर भांडण करत असल्याचे त्याने त्याच्या पुराव्यात सांगितलेले आहे. तसेच सन २०१० साली कोणतेही कारण नसताना अर्जदार क्र. १ हि घर सोडुन निघुन गेली व आठ महिने तिचे माहेरी राहिली. त्यानंतर सामनेवाला याने विधिज्ञांमार्फत अर्जदार क्र. १ हिस नोटीस काढुन देखील ती नांदण्यास आली नाही. त्यानंतर तिला समजावुन नांदण्यास पाठविण्यात आले. त्यानंतर ती काही काळ नांदली व त्यानंतर पुन्हा पुर्वीसारखी वागु लागली

व अर्जदार क्र. २ व ३ यांच्याकडे दुर्लक्ष करु लागली. अर्जदार क्र. १ हि सकाळी १०.३० वाजता घराचे बाहेर पडुन संध्याकाळी पाच वाजता घरी येत असे. त्याबाबत विचारणा केली असता ती तिच्या माहेरी गेल्याचे सांगत असे. तसेच ती सतत कोणाशीतरी बोलत असे व फोन दाखविण्याबाबत सांगितले असता कॉल हिस्ट्री डिलीट करत असे. तसेच महागडया वस्तु घेवुन ती घरी येत असे. त्याबाबत चौकशी करता त्या वस्तु तिच्या भावाने दिल्याबाबत सांगत असे. परंतु तिच्या भावाकडे चौकशी करता त्याने त्या वस्तु तिला दिल्या नसलयाबाबत त्याला सांगितलेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ हि स्वतंत्र खोलीमध्ये जावुन झोपत असे व शारिरिक संबंध करण्यास नकार देत असे. तसेच ती सामनेवाला याच्या कुटूंबातील लोकांशी दादागिरीने बोलत असे. सामनेवाला याने त्याच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये अर्जदार क्र. १ हि माहेरी राहत असल्याबाबत नमुद केलेले आहे व त्याला अर्जदार क्र. १ सोबत संसार करण्याची इच्छा देखील प्रकट केलेली आहे. सामनेवाला याने त्याच्या पुराव्यात पुढे असे सांगितले आहे की, दिनांक ०१.११.२०२१ रोजी त्याने अर्जदार क्र. १ हिस नांदण्यास येण्याबाबात नोटीस पाठवली. तसेच सात ते आठ वेळा तिच्या घरी जावुन तिला नांदण्यास येण्यास आग्रह केला. मात्र अर्जदार क्र. १ हि सामनेवालासोबत नांदण्यास आली नाही. तसेच दिनांक १५.०१.२०२३ रोजी अर्जदार क्र. १ हिचा मामा ज्ञानेश्वर भगत व डॉ. सदाशिव लोणार हे अर्जदार क्र. १ हिस नांदण्यास घेण्यास गेले होते व त्यांनी तिला समजावुन देखील सांगितले. परंतु अर्जदार क्र. १ हिने कोणाचेही काहीही ऐकले नाही.

१८) सदर साक्षीदाराने मागील सात वर्षापासुन आयकर भरत असल्याबाबत त्याच्या उलटतपासामध्ये मान्य केलेले आहे. तसेच सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये त्याची शेती असल्याबाबत व साई एंटरप्राईजेस नावाचे हार्डवेअरचे शॉप असल्याबाबत त्याने त्याच्या उलटतपासात मान्य केले आहे. याव्यतिरिक्त सदर साक्षीदार हा त्याच्या उलटतपासामध्ये त्याच्या सरतपासातील कथनावर ठाम राहिला असल्याचे दिसुन येते.

१९) सामनेवाला याने त्याच्या कथनाच्या पृष्टयर्थ डॉ सदाशिव (सा.सा.क्र. २) याला तपासलेले आहे. त्याने त्याच्या साक्षीमध्ये तो अर्जदार व सामनेवाला यांना ओळखत

असल्याचे व त्यांच्या विवाहाला तो उपस्थित असल्याचे नमुद केलेले आहे. त्याने त्याच्या साक्षीमध्ये पुढे असे सांगितले आहे की, अर्जदार क्र. १ हि सामनेवाला याच्याकडे संसार करणेकामी नांदावयास गेल्यानंतर अर्जदार क्र. १ हि सामनेवालासोबत सतत वाद करत असे व अर्जदार क्र. १ हिस सामनेवालेसोबत संसार करावयाचा नाही असे म्हणत असे. तसेच अर्जदार क्र. २ हि अर्जदार क्र. २ व ३ यांना स्वइच्छेने माहेरी राहण्यास गेली होती. तसेच सामनेवाला याने सदर साक्षीदार यास तिला नांदण्यास घेवुन या असे सांगितले होते. त्यामुळे दिनांक १५.०१.२०२३ रोजी ज्ञानेश्वर भगत यास घेवुन अर्जदार क्र. १ हिला समजवण्याकामी गेला होता. परंतु अर्जदार क्र. १ हिने त्यांचे म्हणणे ऐकले नाही व तिला सामनेवालेसोबत रहावयाचे नसल्याबाबत व त्याच्यासोबत संसार करावयाचा नसल्याबाबत उध्दट उत्तरे दिली. तसेच अर्जदार क्र. १ हिने सामनेवालासोबत संसार करण्याचे स्पष्टपणे नाकारलेले आहे, असे साक्षीदाराने त्याच्या साक्षीमध्ये सांगितलेले आहे.

२०) सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये त्यांच्या समाजातील लोकांमध्ये विवाहाचा खर्च मुलीचे आईवडिल करत असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच त्याचे घर सामनेवाला याच्या बंगल्याशेजारी असल्याचे व सामनेवाला याचे एम.आय.डी.सी. मध्ये दोन स्टीलवर्क च्या कंपन्या असल्याचे त्याने त्याच्या उलटतपासामध्ये सांगितलेले आहे. इतर सर्व बाबींवर सदर साक्षीदार हा त्याच्या सरतपासातील कथनावर ठाम राहिलेला आहे.

२१) उभयपक्षकारांच्या साक्षीचे अवलोकन करता असे दिसुन येते की, अर्जदार क्र. १ व सामनेवाला यांनी बराच काळ एकत्र संसार केलेला आहे व त्यांना त्या संसारातुन अर्जदार क्र. २ व ३ ही अपत्ये देखील झालेली आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही स्वतःहुन तिच्या माहेरी अर्जदार क्र. २ व ३ बरोबर राहत असल्याचे सामनेवाला यांचे कथन संयुक्तिक दिसत नाही. प्रत्येक संसारामध्ये वाद हे होत असतात. परंतु अर्जातील अर्जदाराचे कथन लक्षात घेता तिला मारहाण, शिवीगाळ व पैश्याची मागणी केल्यामुळे कदाचित ती सामनेवाला यास सोडुन अर्जदार क्र. २ व ३ यांच्यासोबत तिच्या माहेरी राहत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्जदार क्र. १ हि सामनेवालापासुन विभक्त राहत आहे, हे सामनेवाला याचे कथन संयुक्तिक नाही. तसेच एकुण पुराव्यावरुन व अर्जदाराने दाखल

केलेल्या मालमत्ता व दायित्वाबाबतच्या प्रतिज्ञापत्रावरुन अर्जदार क्र. १ हि काहीही कामधंदा करत नसल्याचे व तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदार हे स्वतःच्या पालनपोषणास असमर्थ असल्याचे दिसुन येते. त्यामुळे विचारार्थ बाब क्र. १ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**<u>विचारार्थ बाब क्र. ३ व ४ करिताः</u>**

२२) अर्जदाराच्या मालमत्ता व दायित्वाबाबतचे शपथपत्राचे अवलोकन करता असे दिसुन येते की, ति कोणताही कामधंदा करत नाही. याउलट सामनेवाला याने तपासलेले साक्षीदार क्र. २ याच्या साक्षीचे अवलोकन करता असे दिसुन येते की, सामनेवाला याच्या दोन कंपन्या आहेत. तसेच सामनेवाला याने त्याच्या उलटतपासामध्ये तो गेली सात वर्षापासुन आयकर भरत असल्याचे त्याच्या उलटतपासात सांगितले आहे. त्याने त्याच्या मालमत्ता व दायित्वाबाबतच्या शपथपत्रामध्ये वेल्डींग कामातुन प्रतिमहा मिळणारे उत्पन्न ३४,०००/– नमुद केलेले आहे. तसेच त्याने त्याच्या मालमत्ता व दायित्वाबाबतच्या शपथपत्रामध्ये सर्व स्त्रोतांमधुन मिळणारे प्रतिमहा उत्पन्न हे ५१,०००/– नमुद केल्याचे दिसुन येते. सामनेवाला याच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ हि तिच्या माहेरी प्लास्टीक वेल्डींगचा व्यवसाय करते व त्यापासुन तिला दरमहा रक्कम रु. २५,०००/– मिळतात. परंतु हे दाखविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. अर्जदार हिने गट क्र. २४/७ (नि.क्र. २४) चा सातबारा उतारा अभिलेखावर दाखल केलेला आहे. त्यामध्ये सामनेवाला व सदाशिव म्हसु उबाळे यांच्या नावे ०.०७ आर क्षेत्र असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सामनेवाला यास शेतीतुन थोडया प्रमाणात उत्पन्न मिळत असल्याचे दिसुन येते. तसेच गट क्र. २४/६ च्या सातबारा उता–याचे (नि.क्र. २५) चे अवलोकन करता त्यामध्ये सामनेवाला व सदाशिव म्हसु उबाळे यांच्या नावे ०.२५ आर क्षेत्र असल्याचे दिसुन येते. तसेच नि.क्र. २२ वर दिनांक ०६.१२.२०१३ रोजीचे रिजनल ऑफिसर, एमआयडीसी, नाशिक यांच्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. त्यावरुन सामनेवाला याचा मे. श्री. साई एंटरप्राईजेस या नावाने दरवाजे, खिडक्या व इतर हार्डवेअरचे साहित्य विक्री करण्याचा व्यवसाय असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सामनेवाला हा प्रतिमहा पन्नास ते साठ हजाराच्या

दरम्यान त्यास उत्पन्न मिळत असल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदार हे त्यांच्या दैनंदिन गरजांकरीता प्रत्येकी दरमहा रक्कम रु. एक लाख आवश्यक असल्याचे नमुद करत असले तरी सदर गरजांबाबतचा पुरावा अभिलेखावर नाही. अर्जदार क्र. १ हिच्या मालमत्ता व दायित्वाबाबतच्या शपथपत्रामध्ये अर्जदार क्र. २ हि इयत्ता नववीमध्ये व अर्जदार क्र. ३ हा इयत्ता सातवीमध्ये शिकत असल्याचे सांगितलेले आहे. त्यामुळे वाढती महागाई, अर्जदारांचा दैनंदिन खर्च, औषधपाण्याचा खर्च व अर्जदार क्र. २ व ३ यांचा शैक्षणिक खर्च लक्षात घेता अर्जदार क्र. १ हिस प्रतिमहा रक्कम रु. १०,०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रतिमहा प्रत्येकी रक्कम रु. ३०००/– मंजुर केल्यास त्यातुन अर्जदारांच्या पालनपोषणाची निश्चितच सोय होवु शकेल. तसेच सामनेवाला याच्यावर देखील अधिकचा भार पडणार नाही. सबब विचारार्थ बाब क्र. ३ व ४ यांचा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित असुन विचारार्थ बाब क्र. ४ करिता सामनेवाला याने अर्जदार क्र. १ हिस प्रतिमहा रक्कम रु. १०,०००/– प्रमाणे पोटगी द्यावी व अर्जदार क्र. २ व ३ यांस प्रतिमहा रक्कम रु. ३०००/– प्रमाणे प्रत्येकी पोटगी द्यावी असा निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>विचारार्थ बाब क्र. ५ करीता–</u>**

२३) वर चर्चा केल्याप्रमाणे अर्जदार हे पोटगी मिळण्यास पात्र आहे. सदरची पोटगी ही प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यापासून अर्जदार यांना मिळणे आवश्यक आहे. तसेच सामनेवाला याने अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास भाग पाडल्यामुळे खर्चाच्यापोटी सामनेवाला याने अर्जदार क्र. १ हीस रुपये १५००/– देणे योग्य होईल. सबब, विचारार्थ बाब क्र. ५ च्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला.

२. सामनेवाला यास आदेशीत करण्यात येते की, त्याने प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदार क्र. १ हिस दरमहा रु.१०,०००/– प्रमाणे व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी

दरमहा रक्कम रु. ३०००/– पोटगी द्यावी.

३. सामनेवाला याने अर्जदार क्र. १ हिस अर्जाच्या खर्चापोटी रक्कम रु.१५००/– द्यावेत.

४. प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित असताना सामनेवालाने अर्जदारास देण्यात आलेली इतर कोणत्याही प्रकरणातील पोटगीची रक्कम प्रस्तुत प्रकरणातील पोटगीच्या थकीत रक्कम वसुल करतवेळी सदर रकमेतून कमी करण्यात यावी.

५. अर्जदार क्र. १ हिस प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत विनामुल्य द्यावी.

६. न्यायनिवाडा खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

RUSHIKESH RAMDAS JADHAV

Digitally signed by RUSHIKESH RAMDAS JADHAV
Date: 2026.03.24 11:11:39 +0530

दि. १७/०३/२०२६. (**ऋ.रा.जाधव**)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी

न्यायालय क्र. २, सिन्नर.